| | |
|---|---|
| MHKO050045582016 | <u>नियमीत दिवाणी दावा क्र.३९६/२०१६</u><br><u>निशाणी क्र.४४ खाली आदेश</u><br><u>श्री. महादेव श्रावण कुरणे वगैरे</u><br><u>विरुध्द</u><br><u>श्री. रामा जक्काप्पा कुरणे वगैरे</u> |

वादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ३ प्रमाणे मयत प्रतिवादी क्र.१ रामा जक्काप्पा कुरणे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दिलेला आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले की, वादी यांनी प्रस्तुतचा मनाईचा दावा दाखल केला आहे. यातील प्रतिवादी क्र.१ रामा जक्काप्पा कुरणे हे दिनांक २३.०६.२०१८ रोजी मयत झाले आहेत. तरी प्रतिवादी यांचे सदरात प्रतिवादी क्र.१ यांचे पुढे (मयत वारस) असे शब्द घालून त्याखाली वारसांची नांवे रेकॉर्डवर घेणेकरीता वादी यांनी सदरचा अर्ज दिला आहे. सबब, सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली व दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी विनंती केली. वादींनी मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांचा तपशिल प्रस्तुत अर्जात दिला आहे. त्याप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावे अशी विनंती केली. वादींनी मयताचा मृत्यू दाखला दाखल केला. अर्ज मुदतीत असल्याचे कथन करुन अर्ज मंजूर करावा असे कथन केले.

०३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दिले व असे नमुद केले की, प्रस्तुत अर्जातील मजकुर पुर्णपणे चुकीचा असून मुदतीत नसलेने सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा कायम मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल आहे. वादीच्या कथनाप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.१ रामा कुरणे यांचे मृत्यू प्रमाणपत्र वादींनी निशाणी ४३ सोबत दाखल केले आहे. त्यानुसार तो दिनांक २३.०६.२०१८ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुत अर्ज दिनांक ३१.०८.२०१८ रोजी देण्यात आला आहे. त्यावरुन प्रस्तुत अर्ज मुदतीत असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादींनी जरी अर्जाला हरकत घेतली असली तरी मयताचे अर्जात नमुद वारस शिवाय अन्य वारस असल्याबाबत कोणतीही हरकत नाही. दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस दाव्यात सामील असणे आवश्यक दिसते. त्यावरुन दावा अंतिमरित्या व परिणामकारकरित्या निकाली निघण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे

न्यायाचे दिसते.  सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

**१.** निशाणी क्र.४४ हा अर्ज मंजूर करण्यात येतो व वादींनी मयत प्रतिवादी क्र.१ चे वारसबाबत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

PATWE DATARAJ GUNAJIRAO

Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2022.06.08 16:30:45 +0530

दि.०८/०६/२०२२

**(डॉ. डी.जी.पटवे)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.

<u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. File judgment/order are same, word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Shri. R.D. Patil, Grade-III |
| Name of Court | - | Jt. Civil Judge Junior Division, Ichalkaranji. |
| Date of Dictation | - | 08/06/2022 |
| Order signed by the P.O. on | - | 08/06/2022 |
| Order uploaded on | - | 08/06/2022 |